१७. एक वेदान्त समस्या

व्यतिरेकविचाराने येणारी ब्रह्मप्रतीती व अन्वयविचाराने येणारी सर्वात्मब्रह्मप्रतीती ही कांही निर्विकल्पब्रह्मस्थिती नव्हे. ब्रह्म निर्विकल्प आहे व ''मी ब्रह्म'' किंवा ''सर्वच ब्रह्म'' या दोन्ही प्रतीती ज्ञानी पुरुषाच्या चित्तात स्फुरतात तेव्हां ''परा पश्यन्ती मध्यमा'' या तीन वाणींचे व बोलून दाखवितो तेव्हां वैखरीचे साह्य घेतले जाते. जीव जर मूळचाच ब्रह्मस्वरूप आहे तर वाणीचे ऋण घेऊन त्याला आपली ब्रह्मस्थिती टिकविण्याची आवश्यकता काय? व वाणीच्या साह्याने ब्रह्मस्थिती जोपर्यंत सांभाळली जाते तोपर्यंत अज्ञानकाळ व त्यावेळचे खोटे अनुभव यांचा साक्षिभास्य भास होतच राहतो. या भासाकडे तो उदासीनपणे पाहतो; पण त्यामुळे तो ब्रह्मानंदरसाविष्ट होत नाही. मी ब्रह्म किंवा सर्वब्रह्म किंवा सर्व मीच अशी जी

प्रतीती आणि तिचा विसर पडल्याखेरीज ज्ञानी अखंड ब्रह्मानंदरसाविष्ट राहूं शकत नाही व अखंड ब्रह्मानंदरसाविष्ट राहिल्याखेरीज मी ब्रह्म किंवा सर्वच ब्रह्म या प्रतीती विसरल्या जाऊ शकत नाही.

जाणूनि नेणते करी माझ्या मना ।

अशी मागणी श्रीतुकाराममहाराजांनी केली आहे.

जाणीव नेणीव भगवंती नाही ।

असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.

तद्यथा प्रियया स्त्रिया संपरिष्वक्तो न बाह्यं किंचन वेद नान्तरमेवायं पुरुषः प्रासेनात्मा संपरिष्वक्तो न बाह्यं किंचन वेद नान्तरं वा ॥ (बृहदारण्यक)

या श्रुतीत ब्रह्मानंदरसाविष्टदशेत सर्व जाणीव-नेणीव नाहिशशी होते हे सांगितले आहे. तेथे सुखाचे भोक्तृत्वही राहत नाही.

कोणी येथे असे समाधान करतात की, ब्रह्म सच्चिदानंदरूप आहे व परब्रह्माचे हे धर्म एकमेकांना सोडून नसतात म्हणून आत्मज्ञानानेच आनंद मिळतो. पण पंचदशीकारांनी या मताचे खंडण केले आहे.

चैतन्यत्वसुखं चास्य स्वभावश्चेच्चिदात्मनः । धीवृत्तिष्वनुवर्तेत सर्वास्वपि चितिर्यथा ॥
मैवमुष्णप्रकाशात्मा दीपस्तस्य प्रभा गृहे । व्याप्नोति नोष्णता तच्चितेरेवानुवर्तनम् ॥

ज्याप्रमाणे दीपाचे ठिकाणी उष्णता व प्रकाश हे दोन धर्म असूनही घरात प्रकाशाचाच लाभ होतो; त्याप्रमाणे ब्रह्मानुभव जोपर्यंत वृत्तीने घेतला जातो तोपर्यंत तेथे चैतन्यांशाचाच मुख्यतः अनुभव असतो, आनंदांशाचा नाही.

यावर ज्ञानियांचे उत्तर

ब्रह्मानंदरसाविष्ट दशा झाली पाहिजे, यात शंका नाही; पण ती प्रारब्ध आहे तोपर्यंत अखंड प्राप्त होणे शक्य नाही. योगाभ्यासाने कांही काल प्राप्त होते व प्रारब्ध संपल्यावर ती दशा अखंड राहते म्हणूनच वेदान्तात जीवन्मुक्तदशा व विदेहमुक्तदशा असा मुक्तावस्थेचा भेद केला आहे. विदेहमुक्तीत ब्रह्मानंदरसाविष्ट स्थिती असते किंवा ब्रह्मानंदरसाविष्टस्थिती म्हणजेच विदेहमुक्ति होय.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वैशिष्ट्य

पण हे मत श्रीज्ञानेश्वरमहाराजांना मान्य दिसत नाही. ते म्हणतात -

तैसे ग्रासूनि दुसरे । स्वरूपी स्वरूपाकारे ।
आपुलेपणे उरे । बोधू जो कां ॥
तें ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनिया ।
तें पाया पडोनि मियां । सोडविले ॥ अमृ.

द्वैत नाहिसे होऊन अद्वैत आत्मस्वरूप झाल्यावर वाणीच्या साह्याने जी आत्मबोधाची जाणीव होत राहते ती प्ररब्ध संपून देहपात झाला म्हणजे नाहिशी होत नाही. कारण जेवढे काही सच्चिदानंद स्वरूपावर कल्पित किंवा अध्यस्त होते, तें आत्मज्ञान झाल्यावर निवृत्त होते. जेवढे निवृत्त होते तेवढे कल्पितच असते. अज्ञान व अज्ञानाने भासलेला सर्व नाशिवंत जड जगत्प्रपंच आत्मज्ञान झाल्याबरोबर नष्ट झाला. व्यतिरेक ज्ञान झाल्यावर जो अन्वयविचार होतो त्या विचाराने प्रारब्ध शेष राहते, असे देखील मानता येत नाही. सर्वच ब्रह्मप्रतीति झाल्यावर प्रारब्ध तरी ज्ञान्याला कसे भासणार? सर्वब्रह्मप्रतीतीत ब्रह्म नाही असे कांही शेष राहणे शक्य नाही. मग देहपातानंतर निवृत्त होण्यजोगे काय राहिले?

ज्ञान्याच्या प्रारब्धाचे निराकरण

श्री शंकराचार्यांनी पूर्ण ज्ञान्याच्या ठिकाणी म्हणजे -

कारणव्यतिरेकेण पुमानादौ विलोकयेत् ।
अन्वयेन पुनस्तद्धि कार्ये नित्यं प्रपश्यति ॥

याप्रमाणे ज्याने व्यतिरेक व अन्वय या दोन्ही आत्मविचारपद्धतीने सर्वब्रह्मविचार केला, अशा ज्ञान्याच्या ठिकाणी प्रारब्धही नाही; असे प्रतिपादन केले आहे.

उत्पन्ने आत्मविज्ञाने प्रारब्धं नैव मुंचति ।
इति यच्छ्रूयते शास्त्रे तन्निराक्रियतेऽधुना ॥
तत्त्वज्ञानोदयादूर्ध्वं प्ररब्धं नैव विद्यते ।
देहादिनाम् असत्यत्वाद् यथा स्वप्ने विबोधतः ॥
कर्मजन्मान्तरकृतं प्रारब्धमिति कीर्तितम् ।
तत्तु जन्मान्तराऽभावात् पुंसो नैवास्ति कर्हिचित् ।
स्वप्नदेहो यथाध्यस्तस्तथैवायं हि देहकः ॥
अध्यस्तस्य कुतो जन्म जन्माभावे हि तत्कुतः ॥
उपादानं प्रपंचस्य मृद्भाण्डस्यैव कथ्यते ।
अज्ञानं चैव वेदान्तैस्तस्मिन्नष्टे क्व विश्वतः ॥
अधिष्ठाने तथा जाते प्रपंचः शून्यतां व्रजेत् ।
देहस्थापि प्रपंचत्वात् प्रारब्धावस्थितिः कुतः ॥
अज्ञानिजनबोधार्थं प्रारब्धं वक्ति वै श्रुतिः ॥

भावार्थ :- ब्रह्मज्ञानी झाला तरी प्रारब्ध सुटत नाही, हे म्हणणे बरोबर नाही. प्रारब्ध म्हणजे पूर्वी केलेले व फलद्रूप झालेले कर्म. कर्म अविद्याजन्य. ज्ञानाने अविद्या नष्ट झाल्यावर सर्वच खोटे ठरते, मग प्रारब्ध म्हणून काय वस्तु शिल्लक राहते? तेथे कोणतीहि विकृति होत नाही व कांही नाहिसेहि होत नाही. 'कांही दुसरे आहे किंवा उत्पन्न झाले व कांही निवृत्त झाले हा सर्व भ्रमाचा देखावा', असा अनुभव येतो. तेथे प्रारब्ध मानावयाला जागा कोठे आहे? तेव्हां देहपातानंतर निर्वृत्तिक किंवा निर्विकल्प स्थिती होते म्हणण्यात काय अर्थ आहे?

ज्ञानोत्तरभक्तीची आवश्यकता

श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे मते ही निर्विकल्प स्थिती कशाने होते, असे म्णतील तर श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात -

तें पायां पडूनि मिया सोडविले ॥

ज्या सद्गुरूने आध केला त्या सद्गुरूच्या पाया पडून म्हणजे नमन करून

२

नमन सोडविले. ''भक्ति ते नमन'' या श्रीतुकाराममहाराजांचे वचनानुसार 'नमन' भक्ती होय. ज्ञानानंतर प्रेमभक्ती केल्याने आत्मज्ञानाची जाणीव मुरते.

अन्वयविचाराने नामरूपे ही ब्रह्मरूप भासूं लागल्यावर ''नामरूपे ही अविद्या म्हणून उपेक्षणीय'' असे वाटणे शक्य नाही. आत्मा परमप्रिय आहे व तोच आत्मा जर ब्रह्मरूप नामरूपांनी युक्त होऊन भासूं लागला तर तो परमप्रिय वाटल्याशिवाय कसा राहील? आणि ज्या नामरूपयुक्त रामकृष्णादि सगुण ब्रह्माची, ब्रह्मज्ञानापूर्वी उपासना केली त्या रामकृष्णांचे नामरूप तर ज्ञानानंतर अत्यंत प्रिय वाटेल यात शंकाच नाही. कारण त्याचे नामरूप ब्रह्मरूपच आहे, हे आत्मविचाराने कळले म्हणून श्रीज्ञनेश्वरमहाराज म्हणतात, ज्यांना अन्यज्ञान पूर्ण झाले,त्यांना नामरूपे पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे असे कळल्यावर -

ऐसाही स्वामीभृत्य संबंधा- । लागी उठती श्रद्धा ।
तै देवोचि नुसधा । कामविजे ॥ (अमृ.)

पूर्वीचा स्वामी-सेवक हा भक्तीचा व्यवहार कायम ठेवल्यानेच प्रेम उत्पन्न होते व तो तसेच देवाचे प्रेम करीत राहतो. मग त्याचे जपध्यानादि सर्व प्रकारांना देवावांचून कोणताच दुसरा आधार नसतो.

ज्याप्रमाणे डोंगर कोरून देऊळ करावे, त्याचाच पुजारी व पूजासाहित्यही त्याचेच करावे; तसा हा भक्तीचा व्यवहार होतो.

कोणी म्हणतील की ही तरी निर्विकल्प अवस्था कोठे घाली? देव, देऊळ, परिवार ही द्वैताची कल्पना झालीच. – पण द्वैताचा भास दुसऱ्या पाहणाऱ्याच्या दृष्टीनेच आहे, त्याचे दृष्टीने नाही. अशा भक्तांचा अनुभव तर असा आहे की -

द्वैत-दशेचे आंगण । अद्वैत वोळगे आपण ।
भेद तंव तंव दूण । अभेदासी ॥ अमृ.

भक्तीमुळे जितके जितके द्वै घेतले जाईल तितके तितके दुप्पट अद्वैत वाढत जाते.

भोग्य आणि भोक्ता । दि आणि देखता ।
हे सरले अद्वैता । अफूटामाजी ॥ अमृ.

भोग्य-भोक्ता, दृष्टा-दृश्य हे द्वैत मुळीच अनुभवले जात नाही, इतके तें अद्वैत निर्विकल्प राहते. अशा भक्तांचा विषयभोगादि व्यवहार दुसऱ्यास दिसला तरी तो

भगवन्नाम महिमा,,,